E-5231595
02/04/2024

32
02/04/2024


# मिरा भाईदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छपत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईदर (प.)

ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र.022-28192828,

निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय


जा.क्र.मनपा/नि.नि.अ/ 09 /2025-26 दि. 02/05/2025

**प्रति,**

**जनसंपर्क अधिकारी / सिस्टम मॅनेजर**

**जनसंपर्क विभाग**

**मिरा-भाईंदर महानगर पालिका.**

**विषय:- नगर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूकीचा कालबध्द कार्यक्रम प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेतील शहर पथविक्रेत्यांचे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पथविक्रेत्यांचे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याकामी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी निवडणूकीचा कालबध्द कार्यक्रम मराठी भाषेतील पुण्यनगरी , सकाळ व लोकमत या वृत्तपत्रामध्ये तसेच मनपाच्या संकेत स्थळावर प्रसिंध्द करण्यात यावे.

(तुषार सोनावणे)
निवडणुक निर्णय अधिकारी
मिरा भाईदर शहर पथविक्रेता समिती निवडणुक तथा
सहायक आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८,


## निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय

जा.क्र.मनपा/नि.नि.अ/ ०१ /2025-26 दि. 02/05/2025

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2016 मधील नियम 14(2) अंतर्गत आठ (08) पथविक्रेत्यांच्या संदस्यांच्या निवडणूक सन 2025-26 चे कार्यक्रमाबाबत.

### निवडणूक सुचना

ज्या अर्थी पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 अंतर्गत नियम 14 (2) अंर्तगत 08 नगरपथ विक्रेता समितीमध्ये मा. कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मुबई यांचे कार्यालयीन आदेश **क्र.काआ/औसं/प.वि./जि.ठाणे/को.वि/बदली आदेश/2025/कार्या-9/3270 ते 3273** दिनांक-12/03/2025 चे पत्रान्वये माझी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. म्हणुन मा श्री. तुषार सोनावणे सहा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी उपरोक्त पथविक्रेत्यांना कळवित आहे की, पथविक्री विनियमन अधिनियम 2014 अंतर्गत नियम 14(2) अंतर्गत 08 पथविक्रेत्यांच्या संदस्यांच्या पंचवार्षिक निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेणेकरीता खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करीत आहे. सदर निवडणूक खालील दर्शविलेल्या पथविक्रेत्यांच्या संदस्यांच्या आठ (08) जागेकरीता घेण्यात येईल.

**सन 2025 ते सन 2030**

| अ.क्र | गटाचं नाव | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण गटाकरीता (महिला राखीव-01) | 03 | पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 अंतर्गत नियम 11 (2) अंतर्गत 08 (ख-एक) अन्वये |
| 2 | अनुसूचित जाती | 01 | |
| 3 | अनुसूचित जमाती | 01 | |
| 4 | इतर मागासवर्ग | 01 | |
| 5 | अल्पसंख्यांक | 01 | |
| 6 | विकलांग व्यक्ती (महिला राखीव) | 01 | |
| | एकूण | 08 | |

### निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र. | विवरण | दिनांक व दिवस | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| 1 | नामनिर्देशन पत्राचे वाटप करणे | 08/05/2025 गुरुवार<br>09/05/2025 शुक्रवार | स.11:00 ते दु. 03:00 | मनपा मुख्यालय |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | नामनिर्देशन पत्र स्वीकारणे. | 16/05/2025 शुक्रवार | स.11:00 ते दु. 03:00 | निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ,पहिला मजला. मनपा मुख्यालय |
| 3 | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करणे | 17/05/2025 शनिवार | स.11:00 ते छाननी संपेपर्यत | |
| 4 | प्राप्त नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्द करणे | 17/05/2025 शनिवार | छाननीनंतर | |
| 5 | आक्षेप अर्ज स्वीकारणे | 21/05/2025 बुधवार | स.11:00 ते दु. 03:00 | |
| 6 | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | 21/05/2025 बुधवार | दु. 03:00 नंतर | |
| 7 | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | 23/05/2025 शुक्रवार | सायंकाळी 5:00 वाजेपर्यत | |
| 8 | माघारी नंतरची अंतिम यादी प्रसिध्द करणे | 23/05/2025 शुक्रवार | सायंकाळी 5:00 नंतर | |
| 9 | नतदान घेणे | 30/05/2025 शुक्रवार | स.07:30 ते सायं.05:00 | संबंधीत प्रभागामध्ये |
| 10 | मत मोजणी | 31/05/2025 शनिवार | स.10:00 पासुन | नगर भवन माडली तलाव भाईंदर (प) |
| 11 | निवडणुक निकाल जाहीर करणे | 31/05/2025 शनिवार | मतमोजणीनंतर | |

**सुचना:**

1) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहर फेरीवाला समिती निवडणूक लढविण्याकरीता उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे असेल.

- उमेदवाराचे नाव पथविक्रेत्यांच्या अंतिम मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे फेरीवाला नोंदणी प्रामाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या नावे अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, मिरा भाईंदरमहानगरपालिका यांचेकडील थकबाको नसावी.
- उमेदवाराच्या नावे मिरा भाईंदरमहानगरपालिकेकडील मिळकत कर / पाणीपट्टी थकबाकी ना-हरकत दाखला असणे आवश्यक आहे.
- उमेदवार आरक्षित संवर्गातून निवडणूक लढवीत असल्यास त्याच्याकडे त्यासंवर्गातील जातीचा दाखला व जात पडताळणी, विकलांग / दिव्यांग दाखला, अल्पसंख्याक दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने नगरविकास विभाग यांचे पथविक्रेता असाधारण क्र. ११६, ३ ऑगस्ट २०१६ च्या राजपत्रातील अर्जासोबत नमूद घोषणापत्र दाखल करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या पात्रतेबाबत इतर कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सार्वत्रिक निवडणूकमध्ये नमूद असलेले नियम लागू होतील, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ मधील मुद्दा क्र. १६ (२) मध्ये पथ विक्रेत्यास जर तो: (एक) नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी सिध्द दोषी असेल किंवा(दोन) नगर पथविक्रेता समितीचा सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडण्याकरीता शारिरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असेल, तर नगर पथ विक्रेता समितीमध्ये निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

२. नामनिर्देशन पत्र विनामुल्य पुरविण्यात येईल. अंतिम मतदार यादी मिरा भाईंदर मनपाच्या सर्व प्रभाग कार्यालयात उपलब्ध आहे.

Scanned with OKEN Scanner

३. नामनिर्देशन पत्र दाखल करताना त्यासोबत उमेदवारांना अनामत रक्कम रु. २०००/- जमा करावी लागेल व १/६ मतापेक्षा कमी मत मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होईल.

४. पथ विकेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत नियम १६ (२) अंतर्गत उमेदवार अपात्र नसावा

५. अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता नामनिर्देशन पत्र सादर करताना त्यांच्या जाती, जमातीचे सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्राची सत्य प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे अनिवार्य राहील.

६. नामनिर्देशन पत्र स्वतः उमेदवार किंवा त्याचे सुचक व अनुमोदक यांनी व्यक्तीशः जमा करणे बंधनकारक आहे.

७. नामनिर्देशन पत्रावर मतदार यादीमध्ये ज्यांचे नाव समाविष्ट आहे अशा मतदारांपैकी एक सुचक व अनुमोदक यांचे नाव आणि त्यांची सही असणे अनिवार्य आहे.

८. मतदानाला येताना मतदारांनी ओळखपत्र जसे मा. निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले फोटो असलेले ओळखपत्र /पॅनकार्ड / आधारकार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स किवा बँकेने निर्गमित केलेले फोटो असलेले पासबुक सोबत आणावे लागेल अन्यथा मतदान प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

९. निवडणूक कार्यक्रमामध्ये तांत्रिक अडचणीमुळे फेरबदल करण्याचे अधिकार निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे राहतील.

१०. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अनुपस्थितीत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी निवडणुकीचे कामकाज पार पाडतील.

तरी पथविक्रेत्यांच्या सर्व सदस्यांनी उपरोक्त कार्यक्रमाची कृपया नोंद घ्यावी व निवडणूक कार्यक्रम सुरळीत पारः पाडण्यास सहकार्य करावे.

ठिकाण: मिरा भाईंदर
दिनांक: 02/05/2025

आ.प्र. मनपा/भावज/ई-५२३९५८५/२०२५-२६
दि. ०२/०५/२०२५

(तुषार सोनावणे)
निवडणुक निर्णय अधिकारी
मिरा भाईंदर शहर पथविक्रेता समिती निवडणुक तथा
सहायक आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner